सन २०२२-२३ या वर्षासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) अंतर्गत आदिवासी घटक कार्यक्रमासाठी (TSP) निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः मजिअ - २०२२/प्र.क्र.९९/योजना-३
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १७ नोव्हेंबर, २०२२.

वाचा :-

१. शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.एनआरएलएम-२०११/प्र.क्र.१९६/योजना-३, दिनांक १८ जुलै, २०११.
२. केंद्रिय ग्रामीण विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.जे-१२०२५/०१/२०२२-आरएल(एनआरएलएम_१०सी), दिनांक ३१ ऑगस्ट, २०२२.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, एसएसआरएलएम, बेलापूर, नवी मुंबई यांचे पत्र क्र. एसएसआरएलएम/लेखा/४३९६/२०२२, दिनांक ०२ सप्टेंबर, २०२२.
४. शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.बीयुडी-२०२२/प्र.क्र.०८/कार्यासन-६, दिनांक ०९ नोव्हेंबर, २०२२.

प्रस्तावना :-

केंद्र शासनाने सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) अंतर्गत आदिवासी घटक कार्यक्रमासाठी (TSP) अर्थसहाय्य या योजनेकरिता संदर्भाधीन क्र.२ अन्वये पहिल्या हप्त्याचा पहिला टप्पा म्हणून रु.३०,३०,०७,०००/- इतका निधी वितरीत केलेला आहे. सदर निधी राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा झालेला आहे. सन २०२२-२३ मध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) अंतर्गत आदिवासी घटक कार्यक्रम (TSP) केंद्र हिस्सा (२५०१ २९६२) याकरिता रु.१८०,४८,००,०००/- व केंद्र हिस्सा समरुप राज्य हिस्सा (२५०१ २७९३) याकरिता रु.६०,००,००,०००/- इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे. सदर अर्थसंकल्पीत केलेल्या तरतूदीमधून केंद्र हिस्सा रु.३०,३०,०७,०००/- व केंद्र हिस्सा समरुप राज्य हिस्सा रु.२०,२०,०४,६६७/- असा एकूण रु.५०,५०,११,६६७/- इतका निधी वितरित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

१. सन २०२२-२३ मध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) अंतर्गत आदिवासी घटक कार्यक्रम (TSP) केंद्र हिस्सा (२५०१ २९६२) याकरिता अर्थसंकल्पीत केलेल्या तरतूदीतून रु.३०,३०,०७,०००/- (रुपये तीस कोटी तीस लाख सात हजार फक्त) व केंद्र हिस्सा समरुप राज्य हिस्सा (२५०१ २७९३) याकरिता केलेल्या तरतूदीतून रु.२०,२०,०४,६६७/- (रुपये वीस कोटी वीस लाख चार हजार सहाशे सदुसष्ट फक्त) असा एकूण रु.५०,५०,११,६६७/- (रुपये पन्नास कोटी पन्नास

लाख अकरा हजार सहाशे सदुसष्ट फक्त) इतका निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणाली (B.D.S) द्वारे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानास वितरीत करण्यात येत आहे.

२. सदर रक्कम उप संचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, बेलापूर, नवी मुंबई यांच्याकडे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून सुपूर्द करण्यात येत आहे. तसेच वितरीत निधी कोषागारातून थेट SNA खात्यात वर्ग होण्याबाबत दक्षता घेण्यात यावी.

३. सदर रक्कम रु.३०,३०,०७,०००/- इतका खर्च "मागणी क्र.टी-५, २५०१, ग्रामविकासासाठी विशेष कार्यक्रम, ०१, एकात्मीकृत ग्रामविकास कार्यक्रम, ७९६, जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (०७) महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजिविका अभियानासाठी वित्तीय सहाय्य (केंद्रचा हिस्सा) (कार्यक्रम), ३३, अर्थसहाय्य (२५०१ २९६२)" या लेखाशिर्षाखाली व रु.२०,२०,०४,६६७/- इतका खर्च "मागणी क्र.टी-५, २५०१, ग्रामविकासासाठी विशेष कार्यक्रम, ०१, एकात्मीकृत ग्रामविकास कार्यक्रम, ७९६, जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (०४) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान (राज्याचा हिस्सा) (कार्यक्रम), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर), (२५०१ २७९३)" या लेखाशिर्षाखाली सन २०२२-२३ मध्ये केलेल्या तरतूदी मधून भागवावा.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, नवी मुंबई यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखड्यानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशीर्षानिहाय / उपलेखाशीर्षानिहाय साध्य झालेल्या भौतिक उद्दीष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र इ. माहिती संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास, आदिवासी विकास विभाग व ग्राम विकास विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवावी.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, नवी मुंबई यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी घटक कार्यक्रम क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणाऱ्या खर्चावर संनियंत्रण ठेवता येईल.

६. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतुन आदिवासी उपयोजना क्षेत्रात पायाभूत सुविधा निर्माण करण्याबाबतच्या तसेच वैयक्तिक लाभाच्या योजना घेण्यात याव्यात आणि आदिवासी उपयोजना बाह्यक्षेत्रात मात्र वैयक्तिक लाभाच्या योजना घेण्यात याव्यात.

७. हे अनुदान ज्या प्रयोजनाकरीता मंजूर करण्यात आलेले आहे, त्याच प्रयोजनाकरीता खर्च करण्यात यावे. अन्यथा ती वित्तीय अनियमितता समजण्यात येईल, याची अमंलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.

८. या शासन निर्णयान्वये मंजूर केलेले अनुदान कोषागारातून काढल्यानंतर पुढील माहिती त्वरीत लेखाधिकारी कार्यासन क्रमांक योजना-२, ग्राम विकास विभाग यांचेकडे पाठवावी. १) मंजूर केलेली रक्कम, २) कोषागारातून काढलेली रक्कम, ३) रक्कम काढल्याचा प्रमाणक क्रमांक व दिनांक, ४) महालेखापाल कार्यालयातील रक्कमेशी ताळमेळ केल्याचे प्रमाणपत्र.

९. सदर शासन निर्णय वित्त विभाग परिपत्रक दिनांक ०४ एप्रिल २०२२ अन्वये दिलेल्या केंद्र पुरस्कृत योजनांसाठी निधी तसेच राज्य शासनाचा समरुप हिस्सा प्रशासकीय विभागांने त्यांचे स्तरावर वितरित करण्याच्या प्रदान केलेल्या अधिकारानुसार तसेच वित्त विभागाचा अनौ.संदर्भ क्र.८६२/२२/व्यय-१४, दिनांक १९.१०.२०२२ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२१११७१३३६५३९२२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Manoj Dattatraya Jadhav

Digitally signed by Manoj Dattatraya Jadhav
DN: cn=Manoj Dattatraya Jadhav, o=Rural Development Department, ou=Central Scheme, email=manoj.jadhav68@nic.in, c=IN
Date: 2022.11.17 15:09:34 +05'30'

(मनोज जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल (लेखा परिक्षा) व (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२) प्रधान सचिव व निवासी आयुक्त (गुंतवणूक व राजशिष्टाचार), महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली.
३) आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ५ वा मजला, दक्षिण विंग (एसबीआय साईड), सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
५) उप संचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ५ वा मजला, दक्षिण विंग (एसबीआय साईड), सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
६) जिल्हा कोषागार अधिकारी , ठाणे.
७) उप कोषागार अधिकारी, कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई.
८) कक्ष अधिकारी (का.६/का.१७) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९) वित्त विभाग (व्यय-१४) व (अर्थ-१९) मंत्रालय, मुंबई-३२.
१०) कार्यासन अधिकारी, वित्त-१, वित्त-७, योजना-२, ग्राम विकास विभाग.
११) निवडनस्ती.